सामाजिक न्यायाचे पुढचे पाऊल
असंघटित कामगारांसाठी राज्यस्तरावर
परिषद स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.प्राधिकरण- २२००४/प्र.क्र.३२६/कामगार-७,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक :- १ जुलै, २००४

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठया प्रमाणात असून या क्षेत्रातील कामगारांचा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींकरिता असलेल्या कल्याणकारी योजनांमध्ये समावेश नसल्यामुळे, तसेच इतर समन्वय नसल्यामुळे आणि त्यांच्याबद्दलची वस्तुनिष्ठ सांख्यिकी माहिती नसल्याने, या असंघटित कामगारांसाठी योजना आखून त्या अमलात आणणे अद्यापि शक्य झालेले नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता, शासनाने सामाजिक न्यायाचे पुढचे पाऊल म्हणून असंघटित कामगारांसाठीचे एक स्वतंत्र उच्चाधिकार प्राधिकरण स्थापन केलेले आहे. त्या प्राधिकरणास धोरणात्मक मार्गदर्शन करण्यासाठी राज्यस्तरावरील वरिष्ठतम पातळीवर एक परिषद स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

असंघटित कामगारांसाठी विशेषत: ऊसतोड कामगार, बांधकाम मजूर, वीटभट्टी मजूर, विडी कामगार, हातमाग/यंत्रमाग कामगार, चिंध्या गोळा करणारे कामगार, रिक्षा ओढणारे कामगार, घरकाम कामगार (घरगडी व मोलकरीण) वगैरेंसाठी राज्यस्तरावरील प्राधिकरणास धोरणात्मक मार्गदर्शन करण्यासाठी खालीलप्रमाणे परिषद स्थापन करण्यात येत आहे. -

| | |
|---|---|
| १) मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| २) मा. मंत्री (कामगार) | कार्याध्यक्ष |
| ३) मा. मंत्री (सहकार) | सदस्य |
| ४) मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) | सदस्य |
| ५) मा. मंत्री (महसूल) | सदस्य |
| ६) मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य) | सदस्य |
| ७) मा. मंत्री (समाज कल्याण) | सदस्य |
| ८) मा. मंत्री (शालेय शिक्षण) | सदस्य |
| ९) मा. मंत्री (महिला व बाल विकास) | सदस्य |
| १०) मा. राज्यमंत्री (कामगार) | सदस्य |
| ११) विकास आयुक्त (असंघटित कामगार) | सदस्य सचिव |

मा

Scanned by CamScanner

२.	उपरोक्त परिषद स्वतःच्या कामाचे व कामकाजाचे स्वरुप निश्चित करील आणि राज्यस्तरावरील प्राधिकरणास धोरणात्मक मार्गदर्शन करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वी.वि.प्रभु)
उप सचिव (कामगार)

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे सह सचिव (श्री. ओक)
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
५) मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव.
६) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
७) मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य)यांचे खाजगी सचिव.
८) मा. मंत्री (समाज कल्याण) यांचे खाजगी सचिव.
९) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१०) मा. मंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव.
११) मा. राज्य मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
१२) प्रधान सचिव (सामाजिक विकास समन्वय) यांचे स्वीय सहायक
१३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक
१४) उप सचिव (कामगार-७) यांचे स्वीय सहाय्यक
१५) कामगार आयुक्त, मुंबई
१६) सर्व विभागीय आयुक्त, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) सह कामगार आयुक्त,मुंबई
१९) अपर कामगार आयुक्त, मुंबई, पुणे , नागपूर
२०) उप कामगार आयुक्त ठाणे, नाशिक, औरंगाबाद
२१) कामगार विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय व क्षेत्रिय कार्यालये.
२२) मंत्रालयीन सर्व विभाग.
२३) कामगार विभागातील सर्व अधिकारी.
२४) निवड नस्ती. (का-७)

Scanned by CamScanner